राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत आशा स्वयंसेविकांच्या मोबदल्यात वाढ करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः बैठक-०२१९/प्र.क्र.१६९/आरोग्य-७**
१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : १६ सप्टेंबर, २०१९.

वाचा :-

आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे पत्र क्र.राआअ/आशा/राज्य शासन/मोबदला, दिनांक १५ फेब्रुवारी, २०१९ व दिनांक ०९ मार्च, २०१९.

प्रस्तावना :-

राज्यात आशा स्वयंसेविका राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यक्रमांतर्गत कार्यरत आहेत. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना, निकष व दराप्रमाणे राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत प्रकल्प अंमलबजावणी आराखडयात मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून आशा स्वयंसेविकांना राष्ट्रीय आरोग्य अभियान यांनी नेमून दिलेल्या एकूण ७८ सेवा केल्यास त्या सेवेस केंद्र शासनाने निर्धारित केल्याप्रमाणे मोबदला दिला जातो. आशा स्वयंसेविकांना देण्यात येत असलेल्या मोबदल्यात वाढ करण्याबाबत मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०६/०२/२०१९ रोजीच्या बैठकीत झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्याकडून संदर्भाधीन पत्रान्वये प्राप्त झालेल्या प्रस्तावानूसार आशा स्वयंसेविकांना दिल्या जाणाऱ्या मोबदल्यात वाढ करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :-

केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनूसार एकूण ७८ सेवांपैंकी खालील तक्त्यात नमूद नियमित ४ कामांसाठी आशा स्वयंसेविकांना राष्ट्रीय आरोग्य अभियानातून दरमहा रु.२०००/- मोबदला दिला जातो.

| अ.क्र. | तपशिल | आशांना दरमहा द्यावयाचा मोबदला |
|---|---|---|
| १ | आशाला नेमून दिलेल्या भागातील सर्व लाभार्थ्यांची यादी करणे, दिलेल्या सेवांची माहिती व अहवालाचे अचूक संकलन आणि वरिष्ठांना सादर करणे. | रु.१५००/- |
| २ | ग्राम आरोग्य पोषण दिवस अंमलबजावणी- या दिवशी सेवा देण्यासाठी आवश्यक असणारे बालके, माता कुटुंब कल्याण लाभार्थी इत्यादींना सेवा घेण्यासाठी प्रवृत्त करणे. | रु.२००/- |
| ३ | ग्राम आरोग्य, पोषण आणि स्वच्छता समितीची मासिक सभा समितीच्या सचिव या नात्याने बोलाविणे, सभेचे इतिवृत्त तयार करणे, त्यास मान्यता घेणे आणि सभेतील निर्णयांच्या अंमलबजावणीची समितीस माहिती देणे | रु.१५०/- |
| ४ | प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावरील मासिक बैठकीत हजर राहून महिन्यातील केलेल्या कामाचा आढावा देणे. | रु.१५०/- |
| | एकूण | रु.२०००/- |

वरील तक्त्यातील नमूद केलेल्या कामानुरुप आशा स्वयंसेविकांना प्राप्त होणाऱ्या मोबदल्याच्या समप्रमाणात कमाल रु.२०००/- पर्यंत राज्य शासनाच्या निधीतून मोबदला देण्यास मंत्रीमंडळाच्या विहित मान्यतेच्या अधीन राहून शासनाची तत्वत: मान्यता देण्यात येत आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या निर्धारित निकष व दरानूसार इतर निर्धारित ७४ सेवां संदर्भात आशा स्वयंसेविकांना दिल्या जाणाऱ्या मोबदल्यात कोणतीही वाढ अथवा बदल प्रस्तावित नाही.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201908131514050617 असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Milind Raghunath Kulkarni

Digitally signed by Milind Raghunath Kulkarni
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=438fa70bb728385b5c81bde24450c11d5ce0d99ed18a61fb5b1685722e2c2c03, cn=Milind Raghunath Kulkarni
Date: 2019.09.16 19:38:19 +05'30'

**( मिलिंद कुळकर्णी )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रतः-**

१) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सामान्य प्रशासन विभाग, वित्त विभाग, नियोजन विभाग, आदिवासी विकास विभाग, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
३) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
४) अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे.
५) सर्व सह/उप संचालक, आरोग्य सेवा.
६) सर्व सहसचिव/उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग.
७) सर्व जिल्हा शल्य चिकित्सक (FWB मार्फत)
८) सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी (FWB मार्फत)
९) निवडनस्ती (आरोग्य-७)

**प्रत माहितीसाठी अग्रेषित :-**

१) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
२) मा.मंत्री, वित्त व नियोजन यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
३) मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
४) मा.मुख्य सचिव, मुख्य सचिव कार्यालय, मंत्रालय, मुंबई.